नियमित दिवाणी दावा क्र.९१/२०२१
आय.ए. नं. ४/२०२२

आदेश निशाणी क्र.६० वर

1. वादीने स्मरणपत्र पाठविणेबाबत आदेश होणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

2. वादीचे असे कथन आहे की, सदरचे प्रकरण हे नि.क्र.४१ चे आदेशाप्रमाणे कमिशन रिपोर्ट येणेवर नेमण्यात आलेले आहे. कोर्ट कमिशन रिपोर्ट हा न्यायालयात आलेला नाही. सबब, नि.क्र.४१ चे आदेशाप्रमाणे कमिशन रिपोर्ट न्यायालयात दाखल करणेकामी मा.उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर यांना स्मरणपत्र पाठविणेबाबत आदेश होणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

3. प्रतिवादीने म्हणणे देवून अर्जास हरकत नोंदविली. वादीने वेळेत कमिशनची कामगिरी केली नाही. केवळ वेळकाढूपणा केला आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा.

4. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. नि.क्र.४१ चे आदेशाप्रमाणे कमिशन रिपोर्ट न्यायालयात दाखल करणेकामी मा. उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर यांना स्मरणपत्र पाठविणेबाबत आदेश होणेबाबत अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आ दे श

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. नि.क्र.४१ चे आदेशाप्रमाणे कमिशन रिपोर्ट न्यायालयात दाखल करणेकामी मा. उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर यांना स्मरणपत्र पाठविणेत यावे.

सही/-

दि. १५/०३/२०२२

( अर्चना श्रीपत नलगे )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment.

a Name of the Stenographer : Shirsikar V.G.
b Court : 2nd Jt. Civil Judge S.D.Pandharpur
c Date of Judgment : 15/03/2022
d Judgment signed by P.O. On : 15/03/2022
e Judgment uploaded on : 15/03/2022